*खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे*

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

*मराठी विभाग आयोजित*

## मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम अहवाल

दि. २७.२.२०१७

---

दि. २७.२.२०१७ रोजी मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक डॉ. पुरुषोत्तम काळे यांचे मराठीची स्थिती - गती या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील होते. या प्रसंगी डॉ. टी. जी. गिते , डॉ. बी. डी. अनुसे , डॉ संजय शिंदे , प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. वर्षा कांबळे आणि कला शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक डॉ. पुरुषोत्तम काळे यांनी बदलत्या काळात जागतिकीकरण व यांत्रिकीकरणामुळे मराठी भाषेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली असून मराठी भाषेचे उपयोगिता मूल्य कमी होत चालले आहे. या पार्श्वभूमीवर भाषा आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध असून मराठी संस्कृती टिकली तरच मराठी भाषेचे संवर्धन होणार असल्याचे प्रतिपादन केले. डॉ. पुरुषोत्तम काळे यांनी मराठी भाषेच्या उत्क्रांतीचा आढावा घेताना कोणत्याही भाषेचा विकास हा तेथील संस्कृतीच्या विकासाबरोबर होत असल्याने सांगितले. जर संस्कृतीसमोर आव्हान निर्माण झाले तर त्याचा परिणाम भाषेवर होत असतो असे सांगितले.

ग्रामीण जीवनातील जातं गेलं त्याबरोबर ओव्याही गेल्या. मोटेवरील गाणी मोटेबरोबर गेली. कृषिजीवनातील अनेक गोष्टी काळाच्या ओघात नाहीशा झाल्या. सण - उत्सव , लग्नसमारंभ साजरे करण्यातील सांस्कृतिक संदर्भ बदलले. अनेक शब्द , म्हणी, वाक्प्रचार लोप पावले. यामुळे मराठी भाषेचे खूप नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर मराठी लोकसंस्कृतीचे जतन करतानाच मराठी ज्ञानभाषा होण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. युरोपात पूर्वी लॅटिन ज्ञानभाषा होती तिची जागा नंतर इंग्रजी भाषेने घेतली. मराठीच्या बाबतीत शासकीय पातळीवर गांभीर्याने प्रयत्न व्हायला हवे. त्यासाठी मराठी भाषेसाठी सरकारमध्ये स्वतंत्र विभाग व स्वतंत्र विद्यापीठ हवे. पहिलीपासून पदवीपर्यंत मराठी विषय अनिवार्य हवा. महाराष्ट्रात नोकरीकरण्यासाठी मराठी भाषा यायला हवी. इंग्रजी भाषेतील शब्दांना सुलभ असे पारिभाषिक शब्द मराठीत तयार करावे , विज्ञान व तंत्रज्ञानाचे शिक्षण मराठीत घेता यावे. मराठीतून शिक्षण घेतल्यावर नोकरीची हमी मिळावी. मराठी माध्यमांच्या शाळांचा दर्जा वाढावा. अभ्यासक्रमात व्यावहारिक व उपयोजित मराठीचा अंतर्भाव व्हावा. बोलीभाषेचे संवर्धन व्हावे असे अनेक पर्याय त्यांनी सांगितले. मराठी भाषेचा विकास झाला तर मराठी भाषक म्हणून आपलाही तो सन्मान असल्याचे ते म्हणाले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील यांनी सर्व प्रकारचे शिक्षण मराठी भाषेतून उपलब्ध झाले तरच मराठीची मुळे जिवंत व सकस राहतील असे सांगितले. या प्रसंगी मराठी

वाङ्मय मंडळाच्या वतीने  हस्ताक्षर व काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. हस्ताक्षर स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्रियंका राऊत व  काव्यवाचन स्पर्धेतील प्रथम क्रमांक वृषाली शितोळे यांना डॉ. पुरुषोत्तम काळे यांच्या हस्ते पुस्तक भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. संजय शिंदे
मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख



महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे
संपादक डॉ. पुरुषोत्तम काळे यांचा सन्मान



संपादक डॉ. पुरुषोत्तम काळे
विद्यार्थ्यांना मारार्ग्दर्शन करताना




डॉ. पुरुषोत्तम काळे यांच्यासह
प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील. डॉ.टी.जी.गीते



पुण्य नगरी | 4 | मंगळवार, २८ फेब्रुवारी २०१७ | पुणे

# 'संस्कृती टिकली तरच मराठी भाषेचे संवर्धन'

राजगुरूनगर : प्रतिनिधी

बदलत्या काळात जागतिकीकरण व यांत्रिकीकरणामुळे मराठी भाषेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली असून मराठी भाषेचे उपयोगिता मूल्य कमी होत चालले आहे. या पार्श्वभूमीवर मराठी संस्कृती टिकली तरच मराठी भाषेचे संवर्धन होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक डॉ. पुरुषोत्तम काळे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात 'मराठीची स्थिती - गती' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, डॉ. टी. जी. गिते, डॉ. बी. डी. अनुसे, डॉ. संजय शिंदे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. वर्षा कांबळे आणि कला शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.

भाषा आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध स्पष्ट करीत डॉ. पुरुषोत्तम काळे पुढे म्हणाले, जाते गेलं त्याच्याबरोबर ओव्याही गेल्या. मोटेबरची गाणी मोटेबरोबर गेली. कृषिसंस्कृतीत अनेक बदल झाले. सण, उत्सव व लग्नसमारंभातील सांस्कृतिक संदर्भ बदलले. मराठीतील अनेक शब्द, म्हणी व वाक्प्रचार काळाच्या ओघात पडद्यामागे गेल्याचे त्यांनी सांगितले. पहिलीपासून पदवीपर्यंतच्या शिक्षणात मराठी अनिवार्य करणे, आंतरजालावर मराठीतून अधिकाधिक लेखन करणे, इतर भाषांतील दर्जेदार साहित्य मराठीत अनुवादित करणे, बोलीभाषेचे जतन संवर्धन करणे तसेच आधुनिक मराठी शब्दकोश तयार करून त्यात अनेक नवे आजच्या पिढीला आपलेसे वाटतील असे शब्द आले पाहिजेत.

प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी यानिमित्ताने मराठी भाषेची चर्चा होणे गरजेचे असून सर्व प्रकारच्या शिक्षणाचे माध्यम मराठी भाषा झाली तरच मराठी भाषेची मुळे जिवंत व सशक्त राहतील, असे सांगितले.

राजगुरूनगर : मराठी राजभाषा दिनानिमित्त घेण्यात आलेल्या हस्ताक्षर स्पर्धेतील विजेती प्रियका राऊत हिचा सन्मान करताना मान्यवर.

वृत्तपत्रातील प्रसिद्धी

